


RNI NO-MAHMAR/2022/90217

दैनिक निडर निर्भिड
# जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!

संपादक : जितेंद्र कायस्थ
Email- jansanchlan@gmail.com
Mob- 9822720784




वर्ष ३ रे | अंक : ३३ वा | मंगळवार दि. ०४ मार्च २०२५ | पृष्ठ ८ | किंमत ३ रुपये

# महाराष्ट्राच्या राजकारणातील सर्वात मोठी ऑफर!

## शिवसेना पक्ष भाजपत विलीन करा मुख्यमंत्रिपद घ्या...

**वृत्तसंस्था/पुणे**

पुण्यात २२ फेब्रुवारीला झालेल्या भाजपचे दिग्गज नेते तथा केंद्रीय मंत्री अमित शाह आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या भेटीबाबत संजय राऊतांनी मोठा दावा केला आहे. शिंदेंनी पहाटे ४ वाजता अमित शाहांची भेट घेऊन फडणवीसांविरोधात तक्रार केल्याचं राऊतांनी म्हटल आहे. तसंच पक्ष भाजपात विलीन करण्याचा सल्ला शाहांनी शिंदेंना दिल्याचा मोठा दावाही संजय राऊतांनी केला आहे. ठाकरेंच्या शिवसेनेचे मुखपत्र सामनातून धक्कादायक दावा करण्यात आलाय. २२ तारखेला एकनाथ शिंदेंनी अमित शाहांची भेट घेतली. तसंच त्यांनी सरकारमध्ये कोंडी होत असल्याची तक्रार देखील शाहांकडे केली. दरम्यान यावेळी शाहांनी शिंदेंना पक्ष विलीन करण्याची ऑफर दिल्याचा दावाही सामनातून करण्यात आला आहे. सामनातून केलेल्या दाव्यानंतर रामदास आठवलेंनी संजय राऊतांना टोला लगावला आहे. आम्ही कोणाला भेटायचं हे राऊतांनी सांगू नये असं म्हणत आठवलेंनी राऊतांवर निशाणा साधला. शिंदेंच्या काळातील अनेक निर्णयांच्या चौकशीचे आदेश देवेंद्र फडणवीसांनी दिले आहेत. त्यामुळे एकनाथ शिंदेंसह त्यांचे मंत्री देखील नाराज असल्याची चर्चा आहे. कालच मुख्यमंत्र्यांनी शिंदेंच्या काळातील आरोग्य विभागाच्या ३२०० कोटींच्या कामांना स्थगिती दिली. सरकारी रुग्णालये, प्राथमिक आरोग्य केंद्रे आणि उपकेंद्रे येथे बाह्य यंत्रणेद्वारे सफाई करण्याचा करार करण्यात आला होता. त्यासाठी वार्षिक ६३८ कोटी रुपये तर ३ वर्षांसाठी एकूण ३ हजार १९० कोटी रुपयांचे कंत्राट खासगी कंपनीला देण्याला आला होता. मात्र, कोणताही अनुभव नसताना कंत्राट दिल्याचे समोर येत आहे. त्यामुळे मुख्यमंत्री फडणवीसांनी या कामाला ब्रेक लावला आहे. याआधीही जालन्यातील सिडको प्रकल्प आणि मुंबई महानगर पालिकेतील




टेंडरच्या चौकशीचे आदेश फडणवीसांनी दिले आहेत. त्यामुळे महायुतीत एकनाथ शिंदेंची कोंडी होत असल्याची चर्चा आहे

## संजय गांधी योजनेच्या लाभार्थ्यांना आवश्यक कागदपत्रे जमा करण्याचे आवाहन...

### लाभार्थ्यांचा लाभ डीबीटीद्वारे थेट खात्यात जमा होणार...

**जनसंचलन/बुलढाणा**

संजय गांधी निराधार अनुदान योजना व श्रावणबाळ योजनेतील लाभार्थ्यांना अनुदान अर्थसहाय्य डीबीटी पोर्टलद्वारे थेट खात्यात जमा करण्यात येणार आहे. त्यामुळे संजय गांधी निराधार योजनेच्या लाभार्थ्यांनी आपले आवश्यक कागदपत्रे जमा करावीत, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी केले आहे. बुलढाणा जिल्ह्यात विशेष सहाय्य योजनेअंतर्गत एकुण २ लक्ष ३४ हजार ३९८ लाभार्थी आहेत. त्यापैकी राज्य शासनाचे संजय गांधी व श्रावणबाळ योजनेअंतर्गत १ लक्ष ८१ हजार १ लाभार्थी आहेत. तर केंद्र शासनाचे इंदिरा गांधी विधवा, दिव्यांग, वृद्धापकाळ योजनेचे ५३ हजार ३९७ लाभार्थी आहेत. या दोन्ही योजनाच्या लाभार्थ्यांना डिसेंबर २०२४ पासुन डिबीटीद्वारे अनुदान वाटप होण्यासाठी आवश्यक कागदपत्रे जमा करणे गरजेचे आहे. आवश्यक कागदपत्राची पूर्तता न झाल्यामुळे जिल्ह्यातील २ लक्ष ३४ हजार ३९८ लाभार्थ्यांपैकी ६४ हजार २६६ लाभार्थ्यांच्या खात्यात माहे जानेवारी २०२५ या महिन्याची अनुदान रक्कम (प्रत्येक मासिक १५०० रुपये) जमा झालेली नाही. ज्या लाभार्थीना अनुदानाची रक्कम बँक खात्यात जमा झालेली नाही, त्यांनी पुढीलप्रमाणे कार्यवाही करावी. लाभार्थ्यांनी त्यांचे आधार कार्ड व बँक पासबुक संजय गांधी शाखा तहसिल कार्यालय, सबंधित गावचे तलाठी अथवा कोतवाल यांच्याकडे जमा करावे किंवा तहसील कार्यालयामार्फत घेण्यात येणाऱ्या अग्रीस्टॅक, विविध प्रमाणपत्र वाटप शिबिर ठिकाणी जमा करावे.(यापुर्वी जमा केले असल्यास परत जमा करण्याची आवश्यकता नाही), लाभार्थ्यांनी आधार सेवा केंद्राद्वारे आपले आधार अद्यावत असल्याची खात्री करावी. आधार अद्यावत नसल्यास ते अद्यावत करुन घ्यावे. डिबीटी प्रणलीद्वारे अर्थसहाय्य प्राप्त करण्यासाठी लाभार्थ्यांचे बँक खाते व मोबाईल क्रमांक आधारशी संलग्न असणे आवश्यक आहे. यासाठी लाभार्थ्यांनी बँक शाखेत जाऊन अथवा http://resident.uidai.gov.in/bankmapper या वेबसाईटवर आधार संलग्न (आधार सिडिंग) असल्याची खात्री करावी. आधार संलग्न नसल्यास आधार सिडींगचा फार्म बँकेत भरुन द्यावा, अशी माहिती संजय गांधी निराधार योजनेचे तहसिलदार यांनी दिली आहे.

## संडे ऑन सायकल मोहीमचे आयोजन

**जनसंचलन/बुलढाणा**

क्रीडा व युवक कल्याण मंत्रालय व जिल्हा क्रीडा कार्यालयामार्फत रविवार दि. २ मार्च रोजी सकाळी येथील जिल्हा क्रीडा संकुल येथे सायकल मोहीमचे आयोजन करण्यात आले होते. या मोहीमेत जिल्हा क्रीडा प्रशिक्षण केंद्राचे खेळाडू, शारदा ज्ञानपीठ, सहकार विद्या मंदिर, एड्ेड हायस्कूल व बुलढाणाकरांनी उत्स्फुर्तपणे सहभागी झाले होते. यावेळी ङ्खङ्घफिटनेस का डोस, आधा घंटा रोजफ्फ घोषणा देत तंदुरुस्तीचे संदेश देण्यात आले. खेलो इंडिया योजनेच्या फीट इंडीया उपक्रमातंर्गत व पंतप्रधान नरेंद्र मोंदी यांच्या आवाहनानुसार निरोगी राष्ट्राच्या उभारणीस नियमीत शारीरीक व्यायाम व खेळाचे महत्व जनतेला कळण्याच्या उद्देशाने ङ्खङ्घसंडे ऑन सायकलफ्फ ही मोहीम देशभरात राबविण्याबाबत आले होते. या मोहीमेला बुलढाण्यातील जेष्ठ महिला तसेच जिल्हा क्रीडा अधिकारी बी.एस.महानकर, क्रीडा अधिकारी आर. आर. धारपवार, महाराष्ट्र राज्य क्रीडा मार्गदर्शक उज्वला लांडगे, क्रीडा अधिकारी एस. एस. केळे व राज्य क्रीडा मार्गदर्शक डॉ. जे. डब्ल्यू. मोहोड यांनी हिरवा झेंडा दाखवून सायकल मोहीमेला रवाना केले. सायकल मोहीम जिल्हा क्रीडा संकुल- छत्रपती श्री. शिवाजी महाराज मंदिर- आय.टी.आय. रोड ते जिल्हा क्रीडा संकुल या मार्गाने सायकल मोहीमेचे आयोजन करण्यात आले. मोहीमे दरम्यान ङ्खङ्घफिटनेस का डोस, आधा घंटा रोजफ्फ या घोषवाक्याने सायकल मोहीमेची सुरुवात करण्यात आले. तसेच सायकल मोहिमेमधून नागरी वस्तीमध्ये शारीक तंदुरुस्ती महत्तवाची असल्याचे संदेश विद्यार्थ्यांकडून देण्यात आले. सायकल मोहिमेच्या आयोजनासाठी जिल्हा क्रीडा कार्यालयातील सर्व अधिकारी तसेच भीमराव पवार, कृष्णा नरोटे, सुहास राऊत, प्रेम सोनुने, अर्जुन राऊत यांनी सायकल मोहीमेचे यशस्वी आयोजन केले.

# सीआरपीएफ स्थापना: इतिहास आणि महत्त्व!

## संपादकीय लेख

केंद्रीय राखीव पोलीस दल- सीआरपीएफ हे भारतीय पोलीस संस्थेचे एक घटक आहे. हे संघटन भारत सरकारच्या गृहमंत्रालयाच्या आदेशानुसार काम करते. यामध्ये काही महत्वाचे कार्य म्हणजे दंगलीच्या ठिकाणी नियंत्रण ठेवणे, काऊंटर मिलिटरी, बंडखोरी, ऑपरेशन, जमाव नियंत्रण, वामपंथी अतिरेक्यांना सामोरे जाणे, नैसर्गिक आपत्तीच्या वेळी बचाव आणि मदत कार्य करणे, यास्तव केंद्रीय राखीव पोलीस दलाची स्थापना दि.२७ जुलै १९३९ला करण्यात आली. ज्ञानवर्धक माहितीकरिता श्रीकृष्णकुमार आनंदी-गोविंद निकोडे गुरूजींचा सदरलेख अभ्यासा... संपादक.

केंद्रीय राखीव पोलीस दल- सेंट्रल रिझर्व्ह पुलिस फोर्स- सीआरपीएफ हे भारतातील सुरक्षा दलांपैकी एक सर्वात मोठे केंद्रीय दल आहे आणि भारतीय पोलीस सेवेतील हे फोर्स एक बहुउद्देशीय असून अनेक क्षेत्रांतील सुरक्षा करते. सीआरपीएफ भारत सरकारच्या गृह मंत्रालयाच्या (एमएचए) अधिकारात कार्यरत आहे, सीआरपीएफची स्थापना २७ जुलै १९३९ साली झाली आणि यांचा उद्देश अनेक सुरक्षेच्या कार्यात आंतरिक सुरक्षा प्रदान करणे, सीमावर्ती सुरक्षा आणि आणीबाणीच्या परिस्थितीत सुरक्षा, मदत देणे हा होता तसेच सीआरपीएफ विभिन्न क्षेत्रात तैनात करण्यात आली आहे जसे जम्मू आणि काश्मीर, छत्तीसगढ, प्रभावित क्षेत्र तसेच इतर भारत देशातील राज्यांत देखील ही सुरक्षा देण्यात आली आहे. सीआरपीएफचे बोधवाक्य ङ्कसेवा आणि निष्ठाफ्क आहे, भारत देशाच्या स्वातंत्र्यानंतर दि.२ डिसेंबर १९४९ला कायदा लागू करण्यासाठी केंद्रीय राखीव पोलीस दल- सीआरपीएफ बनले आणि निवडणूक काळात देखील सार्वत्रिक निवडणुकांमध्ये केंद्रीय राखीव पोलीस दलाने खूप मोठ्या प्रमाणात सुरक्षेचे कार्य निभावले.

भारत देशाच्या सुरक्षेच्या दृष्टीने सीआरपीएफचे महत्व मोठे आहे, हे फोर्स एक विशेष सशस्त्र दल आहे जे विविध भागात सुरक्षा आणि शांतता राखण्यात महत्वाची भूमिका बजावते. सीआरपीएफ हे सीमा सुरक्षा, अंतर्गत सुरक्षा, व्यावसायिक घटनांचा तपास आणि आपत्कालीन परिस्थितीत त्वरित कार्यवाहीसाठी आहे. सन १९९९च्या साली झालेल्या लोकसभेच्या निवडणुकांमध्ये देखील लाभलेली मोठ्या प्रमाणात सुरक्षितता बघून आपण या फोर्सचे महत्व समजू शकतो. सीआरपीएफच्या एकूण २४६ इतक्या बटालियन आहेत आणि सीआरपीएफ हे भारत देशातील सर्वात मोठे अर्धसैनिक दल आहे. जर आपण याचा इतिहास बघितला तर मध्य प्रदेश राज्यात निमच मध्ये दोन बटालियनद्वारे स्थापना झालेली होती. सीआरपीएफचा जर आपण इतिहास बघितला तर या फोर्सचा पूर्वीपासूनच मुख्य उद्देश हा होता कि भारत देशातील संवेदनशील राज्यांत असलेले ब्रिटिश रहिवासी यांचे संरक्षण करणे होता. ही पूर्वीपासूनच त्याची प्राथमिकता होती, म्हणून सीआरपीएफ नक्कीच या उद्देशांमुळे संरक्षण अंतर्गत आहे, असे म्हणता येईल. सीआयएसएफ हे एक केंद्रीय औद्योगिक सुरक्षा दल आहे आणि हे एक केंद्रीय सशस्त्र दल देखील आहे, जर या फोर्सशी तुलनात्मक विचार केला तर हे सीआयएसएफ औदयोगिक क्षेत्रात- खदानी, विमानतळ, मेट्रो स्टेशन, अणुऊर्जा प्रकल्प आणि इतर महत्वाचे सरकारी तसेच खाजगी क्षेत्रांतील सुरक्षा आणि सुविधा देण्याचे काम करते आणि सीआरपीएफचा जर विचार केला तर हे भारत देशातील सर्वात मोठे केंद्रीय सशस्त्र दलांपैकी एक आहे. या फोर्स कडे- अंतर्गत सुरक्षा, कायदा आणि सुव्यवस्था राखणे, इतर अंतर्गत कारवाया करणे, आपत्तीच्या ठिकाणी तात्काळ सुरक्षा पुरविणे इत्यादी. दोन्हीही फोर्स कामानुसार विभाजित झालेले आहेत आणि दोन्हींनी फोर्स आपापल्या जागी स्वत:ची वेगळी ओळख देऊन आहेत, म्हणून दोन्हीही फोर्सला आपल्या आवडीनुसार आपण प्राधान्य देऊन त्यांची कामे बघून आवड निवडू शकतो. सीआरपीएफ किंवा बीएसएफ कोणते सर्वोत्तम आहे? तर सीआरपीएफच्या कार्याचा विचार आपण मागे केलाच आहे, तर बीएसएफ- सीमा सुरक्षा दल हे भारत देशातील सीमांचे संरक्षण करणारे दल आहे आणि सीमांना संरक्षण देणे, त्याचे प्राथमिक कर्तव्य आहे तसेच- भारत देशाच्या सीमांचे रक्षण करणे, तस्करी, बेकायदेशीर इमिग्रेशन, इतर सीमापार गुन्ह्यांचा प्रतिकार करणे, युद्धाच्या काळात देशात शांतता राखणे, इत्यादी. फोर्सनुसार कामांचे विभाजन झाले आहेत आणि प्रत्येक फोर्स फक्त आपल्या करत असलेल्या कामामुळे विभाजित आहेत.

सीआरपीएफ- सेंट्रल रिझर्व्ह पोलीस फोर्स आणि या फोर्सला भारत देशातील अनेक प्रकारच्या सुरक्षा सोपविण्यात आल्या आहेत. यामध्ये सार्वजनिक लोकांची सुरक्षा राखणे, एखादा कायदा मंजूर झालेला असल्यास त्याची अंमलबजावणी करणे, सीमावर्ती सुरक्षा देणे, त्यानंतर आपत्कालीन परिस्थितीत सुरक्षा, मदत प्रदान करणे, सुरक्षेच्या ठिकाणी तपासणी करणे, शांतता राखणे, गुन्ह्यांचा तपास करणे, आपत्कालीन परिस्थितीत तात्काळ कार्यवाही करणे, विशेष ऑपरेशन, आपत्ती निवारण, निवडणुकांमध्ये वाढीव सुरक्षा पुरविणे आणि कार्यक्रमांमध्ये सहायता देणे अशा अनेकविध सरकारी किंवा सामाजिक सुरक्षा, सुविधेचे काम सीआरपीएफ करते.

# जळगाव जामोद पोलीस स्टेशन हद्दीत २० लाखांचा गुटखा पकडला...

**जनसंचलन/ जळगाव जा**

तालुका हा महाराष्ट्र व मध्यप्रदेशाच्या सीमेवर वसलेला तालुका आहे. मध्यप्रदेश मधून महाराष्ट्रात मोठ्या प्रमाणात अवैधरित्या गुटखा, अग्नि शस्त्रांची मोठी वाहतूक जळगाव जामोद तालुक्यामधुन होत आहे, या अवैध धंद्यांना सहकार्य जळगाव जामोद वन विभागाचे अधिकारी करीत असल्याचे नेहमीच नागरिकांच्या चर्चेत असते यामुळेच जळगाव जामोद तालुका हा अवैध धंद्यांचा अड्डा बनला असून याकडे जळगाव पोलिसांची भूमिका सुद्धा संशयास्पद आहे. दिनांक २ मार्च रोजी मध्यप्रदेश वरून जळगाव जामोद मार्गे नांदुरा कडे जाणाऱ्या मालवाहू बोलेरो पिक अप वाहन भरधाव वेगाने जात होते. यावेळी या वाहनाचा धक्का रस्त्याने जाणाऱ्या एका इसमाला लागल्याने तो जमिनीवर पडला यामुळे नागरिकांनी भरधाव वेगात असलेली बोलेरो पिकअप गाडी मानेगाव जवळ अडविली यामुळे त्या गाडीच्या चालकाची तारांबळ उडाली यामुळे तिथे उपस्थित नागरिकांना शंका आल्याने त्यांनी गाडीमध्ये पाहिले तेथे उपस्थित नागरिकांना गाडीमध्ये गुटखा असल्याचे निदर्शनास आल्याने नागरिकांनी ड्रायव्हरला पकडून पोलीस स्टेशन जळगाव जामोद येथे कॉल केला यावेळी डायरी अंमलदार ग्यानसिंग राठोड यांनी घटनेची माहिती त्यांच्या वरिष्ठांना दिल्याने लगेचच पोलिसांनी घटनास्थळ गाठून आरोपी व गुटख्यासह गाडी पोलीस स्टेशनला आणून लावली. यामध्ये जवळपास दहा ते बारा लाख रुपयांचा महाराष्ट्र मध्ये प्रतिबंध असलेला गुटखा विमल, पानबहार, विमल तंबाखू आढळल्याने पोलिसांनी आरोपीला जेरबंद करून गुटख्याची अवैधरित्या वाहतूक करणाऱ्या मालवाहू बोलेरो पिक अप क्रमांक एमएच ४८ एवाय ३४२१ सह प्रतिबंधित गुटखा किंमत अंदाजे २० लाख ४४ हजार ७२० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. यामध्ये पोलिसांनी मुख्य आरोपी सोडून बोलेरो वाहनाचे चालक यास आरोपी केले. चोर सोडून संन्याशाला फाशी असा येथील पोलीस स्टेशनचा कारभार असल्याचे नागरिक बोलत आहेत. तसेच मध्य प्रदेश होऊन येणार हा अवैध गुटखा खामगाव येथील मोठ्या व्यापाऱ्याचा असल्याचे कळते. याचा संबंध जळगाव जामोद पोलीस



स्टेशन मधील एका कर्मचाऱ्यांशी सुद्धा असल्याचे नागरिकांच्या चर्चामधून कळते. सदरची कारवाई करतेवेळी जळगाव जामोद पोलीस स्टेशनचे ठाणेदार श्रीकांत निचळ, पोलीस उपनिरीक्षक पंकज सपकाळे, पोलीस उपनिरीक्षक नारायण सरकटे, अमोल पंडित, नागेश खाडे, हवालदार पुंडे, उमेश शेगोकार,शिपाई सचिन राजपूत उपस्थित होते. आरोपी मालवाहू बोलेरो पिकअप चालक याच्यावर मानवी आरोग्यासाठी अपायकारक व महाराष्ट्रात प्रतिबंधक असलेला गुटखा वाहतूक प्रकरणी अन्नसुरक्षा मानके नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक पंकज सपकाळे करीत आहेत.

# पाच वर्षाचा मुदब्बीर शेख नईम म्हणतोय अल्लाह पे भरोसा है!

**जनसंचलन/ चांडोळ**

लहान मुले हट्टी असतात. त्यांच्या हट्टासमोर कुणाचेही काहीही चालत नाही. असाच एक प्रकार चांडोळ येथे पाहायला मिळालाय. याठिकाणी एका पाच वर्षे पाच वर्षाच्या मुलाने तब्बल १४ तासांचा पहिला उपवास (रोजा) ठेवला. विशेष म्हणजे यामागाचे कारणही तितकेच अनोखे आहे. अल्लाह पे भरोसा है! असा तो म्हणतोय.. इच्छापूर्तीसाठी त्याची ही तपश्चर्या असावी, असे वाटते! चांडोळ येथील मुदब्बीर शेख नईमचा हा पहिला रोजा आहे. हा रोजा अत्यंत कठीण असतो. मुस्लिम बांधवाच्या रमजान महिन्याचा प्रवास रविवार पासून सूरु झाला आहे. इस्लाम धर्मात रमजानला जास्त महत्व दिले जाते.



यावर्षीही भर उन्हाळ्यात उपवास (रोजा ) ला सुरुवात झाली आहे. चांडोळ येथील ग्रामपंचायत सदस्य सय्यद कलीम अत्तार यांचा ५ वर्षांचा भाचा शेख मुदब्बीर शेख नईम याने आपल्या जीवनातील पहिला रोजा केला आहे.ही बाब कौतुकास्पद समजली जात आहे.

*The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue Court.* 9822720784.
(RNI NO-MAHMAR/2022/90217) Email- jansanchlan@gmail.com

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# औरंगजेब उत्तम प्रशासक म्हणताच एकनाथ शिंदे संतापले; म्हणाले, औरंगजेब म्हणजे क्रुरकर्मा...

**मुंबई :** विधानसभा अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या पहिल्याच दिवशी आमदार अबू आझमी यांनी वादग्रस्त वक्तव्य केले आहे. अबू आझमी यांनी सोमवारी विधानभवन आवारात माध्यमांशी संवाद साधताना म्हटले की, औरंगजेब हा उत्तम प्रशासक होता. आझमींच्या या वक्तव्यामुळे नव्या वादाला फोडणी मिळाली आहे. औरंगजेब हा उत्तम प्रशासक होता. त्याच्या काळात भारताला सोने की चिडीयाँ म्हणायचे. औरंगजेबाच्या राजवटीत भारताचा जीडीपी २४ टक्के होता, त्यामुळे इंग्रज भारताकडे आकर्षित झाले आणि ते भारतात आले, असे वक्तव्य अबू आझमींनी केले आहे. यामुळे राजकीय वर्तुळातून प्रतिक्रिया उमटू लागल्या आहेत. यातच उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदेंनीही प्रतिक्रिया दिली आहे. देशभक्ती दाखवण्याऱ्याविरोधात बोलणं हा देशद्रोह आहे. , असे म्हणत शिंदेंनी फटकारले आहे. एकनाथ शिंदे म्हणाले, छत्रपती शिवाजी महाराज आणि छत्रपती संभाजी महाराज हे आमचे आराध्य दैवत आहेत. छत्रपती संभाजी महाराजांचे हालहाल करून ४० दिवस त्यांचा छळ करुन त्यांना निर्घृणपणे मारण्यात आलं हा क्रुरकर्मा म्हणजे औरंगजेब आहे. शिंदे संभाजी महाराजांचा इतिहास गिरवत पुढे म्हणाले, आपण छावा सिनेमा पाहिला तर अंगावर काटे उभे राहतील. औरंगजेबाचं कौर्य आणि छत्रपती संभाजी महाराजांचं शोर्य दाखवलं आहे. छत्रपती संभाजी महाराजांनी धर्माभिमान बाळगला. त्यांनी धर्माभिमान, राष्ट्राभिमान आणि देशाभिमान सोडला नाही. अशा धर्मवीर संभाजी महाराजांना क्रुरपणे मारलं त्याचं उदात्तीकरण करणं अतिशय दुर्दैवी आहे.शिंदेंनी असेही नमूद केले की, अशा वक्तव्याचा निषेध करावा तेवढा कमी आहे. अबू आझमींवर देशद्रोहाचा गुन्हा दाखल करायला हवा. संभाजी महाराजांनी देशासाठी प्राण अर्पण केला आहे. तर औरंगजेबाचं उत्तम प्रशासक म्हणून कौतुक करणं हे महापाप आहे. अबू आझमींनी माफी मागावी, देशभक्ती दाखवण्याऱ्यावर बोलणं हा देशद्रोह



आहे. त्यांच्यावर देशद्रोहाचा गुन्हा दाखल झाला पाहिजे.औरंगजेब हा उत्तम प्रशासक होता. त्याच्या राजवटीत भारताची सीमा ही अफगाणिस्तान आणि बर्मापर्यंत होती. औरंगजेबाच्या राजवटीत भारताचा जीडीपी २४ टक्के होता, त्यामुळे इंग्रज भारताकडे आकर्षित झाले आणि ते भारतात आले, असे वक्तव्य अबू आझमींनी केले आहे. तर छत्रपती शिवाजी महाराज आणि औरंगजेब यांच्यातील लढाई धार्मिक नव्हती. छत्रपती शिवाजी महाराज यांच्यातील लढाई ही राजकीय होती, असेही अबू आझमी म्हणाले.

# मुख्यमंत्र्यांच्या बंगल्याबाहेर तानाजी सावंत वेटिंगवर, आत गेले पण लगेच परतले , काय घडलं?

**मुंबई :** शिवसेनेचे नेते तथा राज्याचे माजी आरोग्य मंत्री तानाजी सावंत हे आज मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या भेटीसाठी गेले. पण देवेंद्र फडणवीस हे भाजप मंत्र्यांसोबतच्या बैठकीत असल्याने तानाजी सावंत त्यांची भेट घेऊ शकले नाही. तानाजी सावंत हे देवेंद्र फडणवीस यांच्या भेटीसाठी गेले तेव्हा मुख्यमंत्र्यांच्या बंगल्याबाहेर तानाजी सावंत हे ताटकरळ उभे होते. ते बंगल्याबाहेर उभे असतानाचा व्हिडिओ समोर आला आहे. तानाजी सावंत हे फडणवीसांच्या भेटीसाठी बंगल्यात जाण्यासाठी परवानगी मिळावी याची वाट पाहताना दिसत आहेत. तानाजी सावंत जवळपास तीन ते पाच मिनिटे बंगल्याबाहेर वाट पाहत उभे होते. यानंतर सुरक्षा रक्षकांनी बंगल्याचं गेट उघडलं. यानंतर ते बंगल्यात गेले. पण तरीही त्यांची फडणवीसांसोबत भेट होऊ शकली नाही. त्यामुळे अवघ्या काही मिनिटात तानाजी सावंत यांना फडणवीसांची भेट न घेताच परतावं लागलं. देवेंद्र फडणवीस यांची त्यांच्या बंगल्यावर भाजपच्या मंत्र्यांसोबत आज बैठक सुरु होती. त्यामुळे ते तानाजी सावंत यांना भेटीसाठी




वेळ देऊ शकले नसल्याची माहिती आता समोर येत आहे. फडणवीसांनी सर्व भाजपच्या मंत्री आणि आमदारांसाठी आज त्यांच्या बंगल्यावर स्नेहभोजनाचा कार्यक्रम आयोजित केला आहे. या कार्यक्रमावेळी अधिवेशन काळात विरोधक कोणत्या मुद्द्यांवरुन घेरतील आणि आपण कशाप्रकारे त्यांचा प्रतिकार करायचा, तसेच सभागृहात कोणकोणते मुद्दे मांडायचे याबाबत देवेंद्र फडणवीस आपल्या आमदारांना मार्गदर्शन करणार असल्याची माहिती आहे.तानाजी सावंत राज्याचे आरोग्य मंत्री असताना काही निर्णय घेतले होते. त्यांनी दिलेल्या काही आदेशांना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्थगिती दिली आहे. त्यामुळे तानाजी सावंत देवेंद्र फडणवीस यांच्या भेटीसाठी गेल्याची शक्यता आहे. पण त्यांना फडणवीसांच्या बंगल्याबाहेर तीन मिनिटे ताटकळत उभं राहावं लागलं. ते बंगल्यात गेल्यानंतर लगेच बाहेर पडले. त्यांची फडणवीसांसोबत भेट होऊ शकली नाही. दरम्यान, तानाजी सावंत आणि देवेंद्र फडणवीस यांची उद्या भेटीची शक्यता आहे.तानाजी सावंत यांनी विधान भवन परिसरात आज माध्यमांना प्रतिक्रिया दिली होती. मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री प्रत्येक टेंडर प्रक्रियेची चौकशी करतील. विरोधक कोणत्याही विषयावरुन टार्गेट करत आहेत. आम्ही विचलित होऊ यासाठी प्रयत्न सुरु आहेत, अशी टीका तानाजी सावंत यांनी विरोधकांवर केली

# अचानक समोर आलेल्या दुचाकीला वाचवण्याच्या नादात बस उलटली...



**लातूर :** लातूर - नांदेड राज्य महामार्गावर आज सोमवारी दुपारी दोनच्या सुमारास बसचा भीषण अपघात झाला आहे. नांदेडकडून लातूरकडे येणारी बस नांदगावपाटी जवळ पलटली. या रस्त्यावर मोटरसायकलला वाचवण्याच्या प्रयत्नात बस पलटी झाली. अपघात इतका भीषण होता, की या भीषण अपघातात बसमधील ४८ प्रवाशांपैकी ३६ प्रवासी जबर जखमी झाले आहेत. त्यापैकी सहा जणांची प्रकृती अत्यवस्थ आहे. अपघाताची माहिती कळताच पोलीस प्रशासन, वैद्यकीय मदत तात्काळ मिळाली. जखमींना लातूरच्या शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात दाखल करण्यात आलं. यातील तीन ते चार जणांचे हात कोपऱ्यापासून किंवा खांद्यापासून तुटले आहेत. त्यांच्यावर तात्काळ उपचार सुरू असून अपघातात जबर जखमी झालेल्या ३६ जणांपैकी सहा जणांची प्रकृती अतिशय गंभीर असल्याची माहिती आहे. नांदेडकडून लातूरच्या दिशेने येणाऱ्या बसचा आज दुपारी भीषण अपघात झाला आहे. चाकूर येथून निघालेली बस नांदगाव पाटीजवळ आली असता तेथील दुभाजकाजवळ अचानकरित्या समोर आलेल्या दुचाकीला वाचवण्याच्या नादात चालकाने विरुद्ध दिशेला बस घातली आणि रस्ता दुभाजकाच्या कठड्याला धडकल्याने बस पलटली. हा अपघात एवढा भीषण होता, की रस्त्यावर बस जवळपास ५० फूट घासत गेल्याचं प्रत्यक्षदर्शनी सांगितलं.नांदेड - लातूर या बसचा नांदगाव पाटी येथे भीषण अपघात झाल्यानंतर यामध्ये एकूण ३६ जणांना लातूरच्या विलासराव देशमुख सर्वोपचार रुग्णालयात दाखल करण्यात आलं आहे. यापैकी सहा ते सात लोकांचे हात तुटून वेगळे झाले आहेत. अत्यवस्थ असलेल्या रुग्णांवर लातूरच्या सर्वोपचार रुग्णालयात इलाज सुरू आहेत. यापैकी चार लोकांची प्रकृती गंभीर असल्याचं डॉक्टर उदय मोहिते यांनी सांगितलं.जखमींना लातूरच्या रुग्णालयात दाखल केल्यानंतर पोलीस प्रशासन, वैद्यकीय विविध पथकं आणि डॉक्टरांची टीम यांनी मिळून प्रवाशांवर उपचार केले. डॉक्टरांची टीम मिळून जखमींना दवाखान्यात दाखल करुन घेणं आणि त्यांच्यावर योग्य ते उपचार करणं, यासाठी जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर घुगे यांनी प्रशासनाला सूचना केल्या होत्या.

दैनिक जनसंचलन
निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# सामन्यात विराटने अक्षरचे पाय धरण्यासाठी घेतली धाव, किंगबापूच्या पाया पडला...




**दुबई:** चॅम्पियन्स ट्रॉफीच्या शेवटचा साखळी सामना हा भारत आणि न्यूझीलंड संघामध्ये रंगला. भारतीय क्रिकेट संघाने न्यूझीलंडचा ४४ धावांनी पराभव केला. सामन्यात प्रथम फलंदाजी करताना टीम इंडियाने २४९ धावांचा डोंगर उभा केला. २५० धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना न्यूझीलंडचा संघ फक्त २०५ धावांवरच बाद झाला. या सामन्यात एक क्षण असा आला जेव्हा टीम इंडियाचा दिग्गज क्रिकेटपटू विराट कोहली अक्षर पटेलच्या पायांना स्पर्श करू लागला. विराटने असे का केले यामागे एक मोठे कारण आहे. आता प्रश्न असा आहे की विराटने असे का केले? खरं तर, २५० धावांचा पाठलाग करताना, न्यूझीलंड संघ एकेकाळी सामन्यावर नियंत्रण मिळवत होता. विशेषतः केन विल्यमसन क्रीजवर खंबीरपणे उभा होता, तो ८१ धावा काढल्यानंतर खेळत होता. पण अक्षरने त्याच्या स्पेलच्या शेवटच्या चेंडूवर केन विल्यमसनला बाद केले आणि त्याला पॅव्हेलियनमध्ये पाठवले. अक्षरच्या उडत्या चेंडूवर विल्यमसन पुढे आला आणि त्याने शॉट खेळण्याचा प्रयत्न केला. पण विल्यमसन चुकला आणि मागे उभ्या असलेल्या केएल राहुलने त्याला यष्टीचीत केले.

विल्यमसनच्या विकेटवर विराट कोहली सर्वात जास्त उत्साहित दिसला. विराट इतका आनंदी झाला की त्याने धावत जाऊन अक्षर पटेलचे पाय धरु लागला. दरम्यान, अक्षरही हसत कोहलीला थांबवताना दिसला. नंतर दोघेही मैदानात बसून हसून लागले. या संपूर्ण घटनेचा एक व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल होत आहे.आयसीसी चॅम्पियन्स ट्रॉफीमध्ये त्यांची शानदार कामगिरी सुरू ठेवत, त्यांनी तीन सामन्यांत सलग तिसरा विजय नोंदवला. प्रथम, टीम इंडियाने बांगलादेशला ६ विकेट्सने हरवले, त्यानंतर टीम इंडियाने पाकिस्तानवरही ६ विकेट्सने विजय मिळवला. आता न्यूझीलंडला ४४ धावांनी पराभूत केल्यानंतर, संघाने कोणताही सामना न गमावता उपांत्य फेरीत प्रवेश केला आहे. पुढे, टीम इंडियाला ४ मार्च रोजी ऑस्ट्रेलियाविरुद्ध सेमीफायनल खेळायचे आहे.

# आधी क्रिकेट टीमनं लाज घालवली, आता हवाई दलानं

**इस्लामाबादः** तब्बल २९ वर्षांनी पाकिस्तानला आयसीसी स्पर्धेचं यजमानपद भूषवण्याची संधी मिळाली. पण पाकिस्तानी संघ गट पातळीवरच बाद झाला. दोन सामन्यात दोन पराभव पाहावे लागल्यानं त्यांचं स्पर्धेतील आव्हान संपुष्टात आलं. एकीकडे क्रीडा क्षेत्रात ही अवस्था असताना आता सुरक्षा क्षेत्रात पाकिस्तानला धक्का बसला आहे. हवाई दलामुळे पाकिस्तानवर नामुष्की ओढावली आहे. पाकिस्तानच्या पंजाब प्रांतातील सरगोधा भागावरुन उडत असताना हवाई दलाच्या लढाऊ विमानाची इंधन टाकी खाली कोसळली. विमानाची इंधन टाकी थेट जमिनीवर येऊन आदळली. बीबीसीनं याबद्दलचं वृत्त दिलं आहे. पोलीस अधिकाऱ्यांच्या माहितीनुसार, तीन लढाऊ विमानं एकाचवेळी उड्डाण करत होती. तेव्हा एका विमानाची इंधन टाकी (पुढील पानावर)

# दारु तस्करीत नोकरी गेली, पण पोलिसदादा सुधरेना

## नागपूर पोलिसाचा धक्कादायक कारनामा, घटनेनं खळबळ...

**नागपूर:** बडतर्फ पोलिस कर्मचारी व कुख्यात खंडणीबहाद्दर सचिन दिलीप मेश्राम (वय ३५) हा पत्नीच्या मदतीने मानकापूरमधील ताजनगर येथील पार्वती सहनिवास येथे देहव्यापाराचा अड्डा चालवित असल्याची धक्कादायक माहिती गुन्हेशाखेच्या सामाजिक सुरक्षा विभागाने टाकलेल्या छाप्यात उघडकीस आली. पोलिसांनी सचिन, त्याची पत्नी सोनाली (वय २०, दोन्ही रा. ताजनगर), आकाश अशोक जगनीत (वय ३२, रा. कामठी) व संगीता चंदू डंभारे (वय ४८, रा.कळमना) या चौघांना अटक केली. पोलिसांनी पश्चिम बंगालमधील महिलेसह दोन महिलांची सुटका केली. सचिन हा ताजनगरमधील घरी देहव्यापाराचा अड्डा चालवित असल्याची माहिती गुन्हेशाखेचे उपायुक्त राहुल माकणीकर यांना मिळाली.माकणीकर यांनी सामाजिक सुरक्षा विभागाला कारवाईचे निर्देश दिले. माकणीकर, साहाय्यक पोलिस आयुक्त डॉ.अभिजित पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली सामाजिक सुरक्षा विभागाचे महिला पोलिस निरीक्षक कविता इसारकर व त्यांच्या पथकाने शुक्रवारी सायंकाळी ताजनगरमधील सचिन मेश्रामच्या घरी छापा टाकला. पोलिसांनी चौघांना अटक करून दोघींची सुटका केली.पोलिसांनी चार मोबाइल, तीन हजारांचा रोख रकमेसह ५० हजार रुपये किमतीचे साहित्य जप्त केले. सचिन हा कुख्यात आहे. २०१८मध्ये तो रामटेक पोलिस ठाण्यात कार्यरत होता. यावेळी त्याने पोलिसांच्या वाहनातून चंद्रपूर येथे दारूची तस्करी केली होती. याप्रकरणात त्याला अटक करण्यात आली होती. याप्रकरणात त्याला सेवेतून बडतर्फही करण्यात आले होते. काही दिवसांपूर्वी पोलिस अधिकाऱ्याच्या नावे १० लाखांची खंडणी उकळल्याप्रकरणात सचिनला सदर पोलिसांनी अटक केली होती.

# प्रसाद खांडेकरसाठी नम्रता संभेरावची पोस्ट; हास्यजत्रा स्टारने प्रेक्षकांना केली कळकळीची विनंती

**मुंबई:** मित्र मैत्रिणींच्या अतरंगी रियुनियनची गोष्ट सांगणारा चिकी चिकी बुबूम बुम हा सिनेमा २८ फेब्रुवारी रोजी चित्रपटगृहात दाखल झाला. महाराष्ट्राची हास्यजत्रा या कार्यक्रमातील अनेक कलाकार या चित्रपटात महत्वाच्या भूमिकेत आहेत. चा स्टार प्रसाद खांडेकरने या सिनेमाचे दिग्दर्शन केले असून, तो या सिनेमात एक महत्वाची भूमिकादेखील साकारतो आहे. अभिनेत्री नम्रता संभेरावनेही या चित्रपटात छोटीशी भूमिका साकारली आहे. यानिमित्ताने प्रसादच्या या खास सिनेमासाठी नम्रताने सोशल मीडियावर एक पोस्ट शेअर केली आहे. नम्रताने प्रसादबद्दल पोस्ट शेअर करताना लिहिले की, अभिनंदन पश्या, तुझा अभिमान वाटतो. आपला दुसरा सिनेमा चिकी चिकी बुबूम बूम हा चित्रपटगृहात अतिशय उदंड प्रतिसादात चालू आहे. काही भागात तर हाऊसफुल होतोय, हे ऐकून खूपच भारी वाटतंय. कारण अरे ते थिएटर हाऊसफुल झालंय, प्रेक्षक गर्दी करतायंत, हे ऐकायला आपले कान आसुसलेले असतात. प्रेक्षकांना सिनेमा प्रचंड आवडतोय, मनमुराद आनंद लुटतायंत ते चित्रपटाचा आणि तोच आनंद तुझ्या चेहऱ्यावर पूर्णपणे झळकतोय.नम्रताने पुढे लिहिले की, जे जे रसिक आमच्यावर प्रेम करतात त्यांना मी खात्रीने सांगू शकते, २ तास निखळ हास्य हवं असेल चेहऱ्यावर तर हा चित्रपट नक्की पाहा. आपल्या कुटुंबासोबत मित्रांसोबत हा सिनेमा तुम्ही अजून जास्त एन्जॉय करू शकता. रसिकहो नाटकाला तुम्ही जसा उदंड प्रतिसाद देता, तसाच उत्साह चित्रपटगृहात देखील आम्हाला बघायचा आहे. हाऊसफुलच्या पाट्यांचा आनंद तुमच्यामुळेच अनुभवता येतो आणि अधिकाधिक उत्तम काम करण्याचा आणि तुमचं मनोरंजन करण्याचा उत्साह देखील तुमच्यामुळेच



निर्माण होतो.१७ कलाकार एका गोष्टीत गुंफले गेलेत, त्यात ते काय धमाल करू शकतात, हे बघण्याची मज्जा तुम्हाला मोठ्या पडद्यावर लुटता येईल. त्यामुळे कळकळीची विनंती चित्रपटगृहात जाऊनच सिनेमा बघा. आपल्या चित्रपटाला भरभरून यश मिळावं ह्या सदिच्छा तुला, असाच मोठा हो, खूश राहा आणि उत्तम कलाकृती बनवत राहा, अशा शुभेच्छाही तिने या पोस्टमधून प्रसादला दिल्या.स्वप्नील जोशी, प्रार्थना बेहरे, प्राजक्ता माळी, प्रसाद महादेव खांडेकर, रोहित माने, प्रथमेश शिवलकर, नम्रता संभेराव, वनिता खरात, सचिन गोस्वामी, ओंकार राऊत, प्रियदर्शनी इंदलकर, अभिजीत चव्हाण, निखिल रत्नपारखी, प्रभाकर मोरे, चेतना भट, निखिल बने, श्याम राजपूत, ऐश्वर्या बडदे, श्लोक खांडेकर, प्रमोद बनसोडे या कलाकारांची फौज इचिकी चिकी बुबूम बुमम चित्रपटात आहे. नारकर फिल्म्स अँड एंटरटेनमेंट निर्मित, आयडियाज द एंटरटेनमेंट कंपनी प्रस्तुत, स्वर्ण पट कथा आणि प्रजाकार प्रोडक्शन्स यांच्या सहयोगाने /हा सिनेमा प्रेक्षकांच्या भेटीला आला. प्रसादच्या दिग्दर्शनासह फेम प्रथमेश शिवलकरने प्रसादच्या साथीने चिकी चिकी बुबूम बूमचे लेखन केले आहे.

# रविवार म्हणून पार्टी करत होते , पाण्यात जाण्याचा मोह झाला, अन् मित्राला वाचवताना अनर्थ घडला...

**नागपूर:** सुटीचा दिवस असल्यामुळे नागपूर येथील ७ तरुण पार्टी करायला भागिमहारी येथील पाटबंधारे विभागाच्या तलावावर आले होते . यातील एक तरुण अंघोळीसाठी पाण्यात उतरला असता त्याचा बुडून मृत्यू झाला . त्याला वाचवायला गेलेला तरुण देखील पाण्यात बुडून मृत्यू पावला. ही घटना रविवारी दुपारी घडली . रोहित हिरालाल पाल ( ३७,राहणार छिदवाडा ,हल्ली मुक्काम मानेवाडा चौक नागपूर) ,मनोज मोतीराम गायकवाड (४०, रा. मानेवाडा नागपूर) अशी मृत व्यक्तींची नावे आहेत. रोहित आणि मनोज हेदोघेही रेल्वे मध्ये नोकरी



करीत असल्याची माहिती समोर येत आहे. आज रविवारी सुट्टीचा दिवस असल्याने रोहित व मनोज हे आपल्या संदीप अहीरे, अभिषेक यादव, विकास रॉय, शिवकुमार समुद्रे, निलेश टेंभुरणे, व इंदर यादव या पाच मित्रांसोबत पार्टी करण्यासाठी गेले होते. दुपारी भागीमहारी गावापासून ४०० अंतरावरील पाटबंधारे विभागाच्या बांधराझरी तलावावर आले होते. काही वेळ तलावाच्या परिसरात फिरल्यानंतर यातील ५ जणांनी स्वयंपाक बनवायला सुरवात केली होती. दुपारी २.३० ते ३ वाजताच्या दरम्यान रोहित व मनोज आंघोळीकरिता तलावावर आले होते. अशातच मनोज पाण्यात उतरला. त्याला तलावाच्या खोलीचा अंदाज न आल्यामुळे तो गटांगळ्या खाऊ लागला. हे पाहताच त्याला वाचविण्यासाठी रोहितने पाण्यात उडी मारली. पण खोली जास्त असल्याचा अंदाज त्यालाही आला नाही. आणि दोघांचा बुडून मृत्यू झाला. या घटनेची माहिती पारशिवणी पोलिसांना कळताच त्यांनी घटनास्थळ गाठले . त्यांनी तात्काळ एन डी आर एफ च्या टीमला घटनास्थळी बोलावले . तत्पूर्वी स्थानिक लोकांच्या मदतीने तलावामध्ये शोधमोहीम सुरू करण्यात आली. सायंकाळी ६ वाजताच्या सुमारास रोहित पालचा मृतदेह सापडला . त्याचा मृतदेह उत्तरीय तपासणीकरिता पारशिवणी येथील ग्रामीण रुग्णालयात आणण्यात आला .सायंकाळी ७ वाजता शोधमोहीम थांबविण्यात आली . या घटनेसंबंधी पुढील तपास पारशिवणी पोलीस करीत आहे

# ५ ते १० रुपयांच्या भाज्यांत ठासून भरलंय व्हिटॅमिन बी १२, आठवड्याभरात पोकळ सांधे होतील लोखंडी, मृत नसा होतील जिवंत







आजच्या धकाधकीच्या जीवनशैलीत लोक आहाराकडे पुरेसं लक्ष देत नाहीत, त्यामुळे शरीराला आवश्यक असणाऱ्या जीवनसत्त्वांची कमतरता जाणवते. विशेषतः व्हिटॅमिन १२ ची कमतरता ही एक गंभीर समस्या बनत चालली आहे. झोपेतून उठल्यावर सतत थकवा जाणवणे, लक्ष केंद्रित करण्यात अडचण येणे, चिडचिड होणे आणि अशक्तपणा जाणवणे ही १२च्या कमतरतेची काही प्रमुख लक्षणे आहेत. बहुतेक वेळा लोकांना असं वाटतं की व्हिटॅमिन १२ फक्त मांसाहारातून मिळते, पण हे पूर्णपणे सत्य नाही. शाकाहारी लोकांनी योग्य आहार घेतला तर त्यांनाही १२ मिळू शकतो. काही विशिष्ट भाज्या आणि पदार्थ हे १२ मिळवण्यासाठी उपयुक्त ठरू शकतात. त्यामुळे बाजारातील महागड्या सप्लिमेंट्सऐवजी या स्वस्त आणि सहज उपलब्ध होणाऱ्या भाज्या आपल्या आहारात समाविष्ट करा आणि व्हिटॅमिन १२ ची कमतरता दूर करा.

**भोपळा स्वस्त पण शक्तिशाली पोषणतत्वांचा स्रोत**

भोपळ्यामध्ये फायबर्स, अँटीऑक्सिडंट्स आणि महत्त्वाची जीवनसत्त्वे असतात. विशेषतः पिवळ्या आणि लालसर भोपळ्यात व्हिटॅमिन १२ चे प्रमाण अधिक असते. याशिवाय, भोपळा पचनसंस्थेसाठीही फायदेशीर आहे.

**पालक रक्तवाढीपासून मेंदूच्या आरोग्यासाठी उपयुक्त**

पालक ही एक अत्यंत पौष्टिक भाजी असून त्यामध्ये लोह, फॉलिक ॲसिड, फायबर्स आणि व्हिटॅमिन १२ भरपूर प्रमाणात असते. जर तुम्हाला १२ ची कमतरता असेल, तर आहारात पालकाचा समावेश करावा. पालकाचे सूप, पराठे किंवा भाजी नियमित खाल्ल्यास रक्ताची कमतरता दूर होते.

**बीट लाल रक्तपेशींसाठी वरदान**

बीट हे रक्तशुद्धीसाठी ओळखले जाते, पण त्याचबरोबर त्यामध्ये व्हिटॅमिन



१२ आणि लोह देखील असते. १२च्या कमतरतेमुळे अशक्तपणा जाणवत असल्यास बीट खाणे फायदेशीर ठरते.

**ब्रोकोली व्हिटॅमिन आणि अँटीऑक्सिडंटचा उत्तम स्रोत**

ब्रोकोलीमध्ये व्हिटॅमिन १२ सोबतच फायबर्स आणि अँटीऑक्सिडंट्स देखील असतात, जे शरीराच्या एकूण आरोग्यासाठी उपयुक्त असतात. मेंदूचे कार्य सुधारण्यासाठी आणि हाडांचे आरोग्य उत्तम ठेवण्यासाठी ब्रोकोली फायदेशीर ठरते.

**कोबी पचनासाठी आणि १२ साठी उपयुक्त**

कोबीमध्ये फायबर्स, जीवनसत्त्वे आणि अँटीऑक्सिडंट्स असतात. विशेषतः आंबट कोबी हा १२ मिळवण्यासाठी एक उत्कृष्ट पर्याय आहे. व्हिटॅमिन १२ ची कमतरता भरून काढण्यासाठी बाजारातील महागडी औषधे घेण्यापेक्षा सहज उपलब्ध होणारी आणि स्वस्त भाज्या आहारात समाविष्ट करा. भोपळा, पालक, बीट, ब्रोकोली आणि कोबीसारख्या भाज्यांमधून १२ मिळू शकतो. या भाज्या केवळ १२च नाही, तर शरीरासाठी आवश्यक असणारी इतर जीवनसत्त्वे आणि खनिजेही पुरवतात. त्यामुळे तुमच्या आहारात या भाज्यांचा समावेश करून स्वतःला निरोगी ठेवा!

**मागील पानावरून...**

कोसळली. याचा फटका गुराढोरांना बसला. दुभती जनावरं पाळणाऱ्यांचं नुकसान झालं. याआधी एप्रिल २०२३ मध्येही अशीच एक घटना घडली होती. पाकिस्तानच्या एका लढाऊ विमानाची इंधन टाकी रावळपिंडी रोडवरील एका डोंगराळ भागात कोसळली. यानंतर एक मोठा स्फोट झाला. त्यामुळे स्थानिक रहिवासी घाबरले. त्याआधी १९९७ मध्येही कराचीतील एका निवासी भागात विमानाची इंधन टाकी कोसळली होती. त्यात ६ जणांचा मृत्यू झाला होता. लढाऊ विमानांच्या धडाखाली किंवा पंखांखाली इंधन टाकी असते. ही टाकी लांबट, सिगारच्या आकाराची असते. त्यांना ड्रॉप टँकही म्हटलं जातं. या टाक्या विमानाला जोडलेल्या असतात. यामुळे विमान अतिरिक्त इंधन घेऊन उड्डाण करतं. यापैकी काही टाक्यांवर युनिट मार्किंगही असतं. त्यामुळे त्या टाक्या सहज ओळखू येतात. ड्रॉप टँकचा वापर स्पॅनिश युद्धावेळी (१९३६-१९३९) प्रथम करण्यात आला. यानंतर जगभरात वापरल्या जाणाऱ्या लढाऊ विमानांना इंधन टाक्या लावल्या जाऊ लागल्या.यानंतर लढाऊ विमानांसाठी इंधन टाक्या गरजेच्या झाल्या. मित्र राष्ट्र आणि रॉयल एअर फोर्सनं टेहळणी विमानं आणि लांबपर्यंत बॉम्बफेक करणाऱ्या विमानांचा सीमा विस्तार सुरु केला. त्यामुळे इंधन टाक्या असलेल्या विमानांच्या विकासावर भर देण्यात आला. सुरुवातीला ड्रॉप टँकांबद्दल अनेक प्रश्न उपस्थित केले गेले. पण त्यानंतर हळूहळू सगळ्याच लढाऊ विमानांमध्ये इंधन टाक्या बसवण्यात आल्या. याचा फायदा दुसऱ्या महायुद्धात मित्रराष्ट्रांना झाला.

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!


# महाराष्ट्राच्या राजकारणात ट्विस्ट! शरद पवारांच्या राष्ट्रवादीत रोहित पवार नाराज?

**मुंबई :** महाराष्ट्राच्या राजकारणात आता नवा ट्विस्ट येताना दिसतोय. कारण महाविकास आघाडीमधील तरुण तडफदार नेते रोहित पवार यांच्या नाराजीची बातमी समोर आली आहे. राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार रोहित पवार हे नाराज असल्याची चर्चा आहे. विशेष म्हणजे त्यांच्या या नाराजीच्या चर्चा असतानाच आता त्यांनी एक मोठं वक्तव्य केलं आहे. विरोधी पक्ष लढत नाही म्हणून लोकं नाराज आहेत. सात वर्षांपासून मी पक्षात आहे. मी कुठेतरी कमी पडत असेल असं काही नेत्यांना वाटत असेल, असंही रोहित पवार यांनी म्हटलं आहे. तसेच रोहित पवार यांनी माध्यमांसमोर आपण नाराज असल्याचं मान्य केलं आहे.



मला पक्षाने जबाबदारी दिली नाही म्हणून मी नाराज असल्याचा विषय येत नाही. माझं एकच मत आहे, आज खऱ्या अर्थाने लढण्याचे दिवस आहेत. लढलं गेलं पाहिजे. राहिला प्रश्न जबाबदारीचा तर कदाचित सात वर्षात कुठेतरी मी कमी पडत असावा असं काही नेत्यांना वाटत असावं म्हणून त्यांनी त्याबाबत निर्णय घेतला असेल. नाहीतर काही महत्त्वाचे निर्णय उद्या घ्यायची गरज असेल, त्यावेळेस तो निर्णय होईल. पण तिथे काय चर्चा झाली हे मला तरी सांगता येणार नाही, अशी प्रतिक्रिया रोहित पवार यांनी दिली.मी विरोधी पक्षांच्या सर्व नेत्यांना विनंती करतो. त्यामध्ये अनेक दिग्गज आणि अनुभवी नेते आहेत. पण आज सरकारच्या विरोधात लोकांच्या बाजूने फार कमी नेते बोलताना दिसतात. आज लढण्याचे दिवस आहेत, शांत बसण्याचे नाही. त्यामुळे संपूर्ण महाराष्ट्र आज नाराज आहे. त्यात मी सुद्धा नाराज आहे, असं बोलायला हरकत नाही, असं रोहित पवार स्पष्ट म्हणाले आहेत.रोहित पवार यांच्या नाराजीच्या चर्चे वर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी प्रतिक्रिया दिली. महाविकास आघाडी आता महाविकास बिघाड आहे का ते माहिती नाही, असा टोला त्यांनी लगावला. महाविकास आघाडी ही महाराष्ट्र विरोधी आघाडी आहे, अशी टीका एकनाथ शिंदे यांनी केली.राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार शेळके यांनी याबाबत मोठा दावा केला. रोहित पवार यांना पक्षाचं प्रदेशाध्यक्ष व्हायचं होतं. पण त्यांना ते पद न मिळाल्यामुळे ते नाराज आहेत. त्यांनी हे उघडपणे व्यक्त केलं आहे. त्यांना सत्तेचा मोह आवरत नाही. त्यांना सत्तेत आल्याशिवाय पर्याय नाही. ते सत्तेत कधीही सामील होऊ शकतात, असा दावा सुनील शेळके यांनी केला

## टीम इंडियाचं टेन्शन वाढलं, सेमीफायनलपूर्वी ऑस्ट्रेलियाचा मास्टरस्ट्रोक, संघात अचानक ऑलराउंडरची एन्ट्री...

**दुबई:** आयसीसी चॅम्पियन्स ट्रॉफीच्या उपांत्य फेरीच्या सामन्यांचे वेळापत्रक निश्चित झाले आहे. पहिल्या सेमीफायनल सामन्यात टीम इंडियाचा सामना ऑस्ट्रेलियाशी होईल, तर दुसऱ्या सेमीफायनलमध्ये दक्षिण आफ्रिका न्यूझीलंडशी भिडेल. भारतविरुद्ध ऑस्ट्रेलिया हा सामना दुबईत रंगणार आहे. उपांत्य फेरीच्या सामन्यापूर्वी ऑस्ट्रेलियाला मोठा धक्का बसला कारण त्यांचा स्टार सलामीवीर मॅथ्यू शॉर्ट दुखापतग्रस्त झाला आणि तो स्पर्धेतून बाहेर पडला. पण त्याच्या जागी एका बलाढ्य खेळाडूला संघात स्थान देण्यात आले आहे. ऑस्ट्रेलियन संघात मॅथ्यू शॉर्टच्या जागी खेळाडूची घोषणा करण्यात आली आहे. क्रिकेट ऑस्ट्रेलियाने शॉर्टच्या जागी कूपर कॉनोलीचा संघात समावेश केला आहे. कॉनोली हा एक हुशार अष्टपैलू खेळाडू आहे जो फलंदाजीसोबतच फिरकी गोलंदाजीतही पारंगत आहे. शॉर्टबद्दल बोलायचे झाले तर, अफगाणिस्तानविरुद्ध क्षेत्ररक्षण करताना त्याला दुखापत झाली.स्ट्रेलियाचा कर्णधार स्टीव्ह स्मिथ म्हणाला की,मला वाटते की तो पूर्णपणे तंदुरुस्त नाही, आम्हाला दिसले की तो नीट हालचाल करू शकत नव्हता. पुढच्या सामन्यात त्याला सावरणे कठीण होईल. २९ वर्षीय मॅथ्यू शॉर्टने २०२३ मध्ये ऑस्ट्रेलियासाठी एकदिवसीय आणि टी मध्ये पदार्पण केले. तेव्हापासून त्याने ऑस्ट्रेलियासाठी १५ एकदिवसीय सामने खेळले आहेत ज्यामध्ये शॉर्टने २ अर्धशतकांसह २८० धावा केल्या आहेत. तर १४ टी-२० सामन्यांमध्ये त्याने १६३.७ च्या स्ट्राईक रेटने १ अर्धशतकाच्या मदतीने २९३ धावा केल्या आहेत.कूपर कॉनोलीचा ऑस्ट्रेलियन संघात प्रवासी राखीव खेळाडू म्हणून समावेश करण्यात आला. ऑस्ट्रेलियन संघात त्याच्या समावेशाला आयसीसीच्या तांत्रिक समितीने मान्यता दिली आहे. कूपर कॉनोलीने गेल्या वर्षी इंग्लंडविरुद्ध एकदिवसीय सामन्यात पदार्पण केले. त्याने आतापर्यंत ३ एकदिवसीय सामने खेळले आहेत, ज्या दरम्यान त्याच्या बॅटमधून फक्त १० धावा आल्या आहेत. तो टीम इंडियाविरुद्धच्या सेमीफायनलमध्ये खेळेल की नाही हे निश्चित नाही. ऑस्ट्रेलिया संघात जेक फ्रेझेक मॅकगर्कला सलामीवीर म्हणून समाविष्ट करू शकते.

# विरोधक आक्रमक, विधानसभा अध्यक्षांच्या दालनात ४ बड्या नेत्यांची बंद दाराआड चर्चा, माणिकराव कोकाटे यांच्या मंत्रिपदाचं काय होणार?

**मुंबई :** कृषीमंत्री माणिकराव कोकाटे यांना १९९६ च्या एका प्रकरणात कोर्टाने २ वर्षांची शिक्षा सुनावली आहे. या निकालाविरोधात माणिकराव कोकाटे यांनी वरिष्ठ कोर्टात शिक्षेला स्थगिती मिळावी यासाठी धाव घेतली आहे. या प्रकरणी कोर्टात ५ मार्चला सुनावणी होणार आहे. पण माणिकराव कोकाटे यांना शिक्षा सुनावण्यात आल्याने सरकारने त्यांचा राजीनामा घ्यावा, अशी मागणी विरोधकांनी आज विधान परिषदेच्या सभागृहात केली. विधीमंडळाचं आजपासून अर्थसंकल्पीय अधिवेशन सुरु झालं. यावेळी विरोधकांनी माणिकराव कोकाटे यांच्या राजीनाम्यासाठी प्रचंड आक्रमक भूमिका घेतली. विरोधकांनी गदारोळ घातल्यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी उत्तर दिलं. कोर्टाची ऑर्डर आल्यावर माणिकराव कोकाटे यांच्या राजीनाम्याबाबत निर्णय घेऊ, असं देवेंद्र फडणवीस यांनी विरोधकांना सांगितलं. विधान परिषदेचे विरोधी पक्षनेते अंबादास दानवे आज सभागृहात चांगलेच आक्रमक झाले. राज्याचे कृषीमंत्री माणिकराव कोकाटे यांना शिक्षा झालेली आहे. या शिक्षेला कोणत्याही प्रकारची स्थगिती देण्यात आलेली नाही. दोन वर्षांची शिक्षा झालेली आहे. मग सरकारची या प्रकरणात भूमिका काय आहे?, असा सवाल अंबादास दानवे यांनी केला. यावेळी विधान परिषदेचे सभापती राम शिंदे यांनी संबंधित सदस्य हे विधानसभेचे आहेत. तो विषय त्या सभागृहात येईल. दोन्ही सभागृहांचा मंत्री असतो. पण ते विधानसभेचे सदस्य असल्याकारणाने तिथे हा विषय येईल, असं सभापती राम शिंदे म्हणाले.विरोधकांचा आक्रमक पवित्रा पाहता अखेर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना भूमिका मांडावी लागली. मी विरोधी पक्षनेत्यांना एवढंच सांगू इच्छितो की, आपण मंत्री महोदयांबद्दल जे म्हणत आहात, त्याबाबत कोर्टाने सुनावणी पूर्ण केली आहे आणि निकाल राखून ठेवला आहे. त्यांची ऑर्डर आल्यानंतर त्यावर सभागृह किंवा राज्यपाल निर्णय घेतील, असं




अश्वासन देवेंद्र फडणवीस यांनी दिली.दरम्यान, मंत्री माणिकराव कोकाटे यांची आज तीन प्रमुख नेत्यांसोबत बैठक पार पडल्याची माहिती आहे. माणिकराव कोकाटे यांची मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार आणि विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांच्यासोबत बैठक पार पडल्याची माहिती समोर आली आहे. विधानसभा अध्यक्षांच्या दालनात चारही नेत्यांची बैठक पार पडली. या बैठकीनंतर माणिकराव कोकाटे यांनी वेळ येईल तेव्हा मी माझी भूमिका मांडेल, अशी प्रतिक्रिया माध्यमांना दिली.

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# दोन अल्पवयीन मुलांची आत्महत्या

जनसंचलन/ डोणगाव

परिसरात एक आठवड्यात दोन अल्पवयीन मुलांनी आत्महत्या केल्या आहेत. एक घटना २७ फेब्रुवारी रोजी घडली होती, तर दुसरी घटना ३ मार्च रोजी घडली. या दोघांच्याही आत्महत्या मागील कारण मात्र स्पष्ट होऊ शकले नाही. अनुक्रमे १५ आणि १७ वर्षे वयाचे ते होते. याप्रकरणी डोणगाव पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. १५ वर्षीय अल्पवयीन मुले गजानन महाराज मंदिर परिसरात आत्महत्या केली होती, तर ३ मार्च रोजी १७ वर्षीय मुलाने गळफास घेऊन आत्महत्या केली. गेल्या एक वर्षात डोणगाव परिसरात आत्महत्येचे प्रमाण वाढले आहे. या भागात जवळपास २० जणांनी वर्षभरात आत्महत्या केल्या आहेत. त्यामुळे याची नेमकी कारणमिमांसाही होणे गरजेचे आहे. या त्यात अल्पवयीन मुलेही आता आत्महत्या करू लागली आहे. यासंदर्भाने पालक-पाल्य संवादावर जोर देण्याच्या दृष्टीनेही या भागात कार्यशाळा घेण्याची अवश्यकता आहे. दोन दिवसापूर्वी डोणगावनजीकच्या गावातील एका युवकाने अकोल्यात मित्र व पोलिस अधिकाऱ्याच्या जाचाला कंटाळून आत्महत्या केली होती.

# डॉ. धनंजय तळवणकर उत्कृष्ट प्राचार्य पुरस्काराने सन्मानित

जनसंचलन/ खामगाव

गो. से. विज्ञान, कला व वाणिज्य महाविद्यालय खामगाव चे प्राचार्य डॉ. धनंजय तळवणकर यांना यशवंतराव चव्हाण सेंटर मुंबई येथे नुकत्याच पार पडलेल्या राज्यस्तरीय पुरस्कार वितरण सोहळ्यामध्ये उत्कृष्ट प्राचार्य प्रवर्तक पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. उच्च व तंत्र शिक्षण विभाग तसेच महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहायता केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने सुरू असलेला करिअर कट्टा हा उपक्रम या उपक्रमांतर्गत विविध योजना प्रभावीपणे महाविद्यालयामध्ये राबवून विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकासाकरिता तसेच विद्यार्थ्यांचे भविष्य उज्वल घडविण्याच्या दृष्टीने केलेल्या अथक प्रयत्नांची पावती म्हणून उत्कृष्ट विभागीय प्राचार्य प्रवर्तक पुरस्काराने गौरविण्यात आले. करियर कट्ट्याचा राज्यस्तरीय पुरस्कार वितरण सोहळा दिनांक २५ फेब्रुवारी २०२५ रोजी करिअर कट्ट्याच्या वर्धापन दिनानिमित्त यशवंतराव चव्हाण सभागृह मुंबई येथे पार पडला. यावेळी प्रमुख अतिथी नामदार उदय जी सामंत उद्योग मंत्री महाराष्ट्र राज्य तसेच डॉ. प्रफुल्ल पाठक संचालक स्किल कौन्सिल सेक्टर श्रीमती पाटोळे, डॉ. सोनाली लोहार व महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्राचे अध्यक्ष यशवंत शितोळे यांचे उपस्थितीत देण्यात आला. महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्र शिक्षण विभाग तसेच महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहायता केंद्र यांचे



संयुक्त विद्यमाने चालविल्या जाणाऱ्या करिअर कट्टा उपक्रमा बाबत २०२४ मधील विविध पुरस्कार जाहीर करण्यात आले. ह्या यशस्वी ते करिता प्राचार्य डॉ. धनंजय तळवणकर यांचे सर्व स्तरातून अभिनंदन करण्यात येत आहे. अशी माहिती एका प्रसिद्धी पत्रकाद्वारे प्रा. डॉ. मोहम्मद रागिब देशमुख यांनी दिली आहे.

# अखेर क्रांतिकारी शेतकरी संघटनेचे प्रमुख शिलेदार ठरले..!

## शेतकरी नेते रविकांत तुपकरांकडून नवीन पदाधिकाऱ्यांच्या नियुक्त्या जाहीर..

जनसंचलन/बुलढाणा

शेतकरी चळवळीची नवी क्रांती निर्माण करण्यासाठी शेतकरी नेते रविकांत तुपकर यांनी क्रांतिकारी शेतकरी संघटनेची नव्याने स्थापना केली आहे. या संघटनेच्या प्रमुख शिलेदारांची अर्थात पदाधिकाऱ्यांची निवड पार पडली असून पुणे येथे झालेल्या राज्य कार्यकारिणीच्या बैठकीत शेतकरी नेते रविकांत तुपकर यांनी नवीन पदाधिकाऱ्यांच्या नियुक्ती जाहीर केल्या. या संघटनेच्या महाराष्ट्र राज्य प्रदेशाध्यक्ष पदाची धुरा लातूर जिल्ह्यातील राजकुमार कसबे यांच्या खांद्यावर सोपविण्यात आली आहे. क्रांतिकारी शेतकरी संघटनेची राज्य कार्यकारणीची बैठक पुणे येथील श्रमिक पत्रकार भवनात आज ०३ मार्च रोजी मोठ्या उत्साहात पार पडली. अगदी गडचिरोली, भंडारा, नागपूर पासून ते सोलापूर, कोल्हापूर,धुळे, ठाणे पर्यंतच्या महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्ह्यातून प्रमुख पदाधिकारी, शिलेदार या बैठकीला मोठ्या संख्येने उपस्थित झाले होते. क्रांतिकारी शेतकरी संघटनेची ही पहिलीच बैठक असल्याने राज्याच्या कान्याकोपऱ्यातून आलेल्या पदाधिकारी, कार्यकर्ते व शेतकऱ्यांचा उत्साह ओसंडून वाहताना दिसून आला त्यामुळे ही बैठक हाऊसफुल्ल आणि धडाकेबाज ठरली. यावेळी बोलताना रविकांत तुपकर यांनी सांगितले की क्रांतिकारी शेतकरी संघटना ही महाराष्ट्रात शेतकरी चळवळीची नवी क्रांती घडविण्यासाठी निर्माण केली आहे. सध्या चळवळी क्षीण होत आहेत, संघटना विखुरल्या आहेत, सरकारने शेतकऱ्यांना वाऱ्यावर सोडले आहे त्यामुळे शेतकऱ्यांना त्यांचा न्याय - हक्क मिळवून देण्यासाठी राज्यभर पुन्हा एकदा पेटून उठण्याची गरज आहे. शेतकरी चळवळीला गत वैभव प्राप्त करून देण्यासाठी आपण आता महाराष्ट्रभर फिरून मोठे संघटन उभे करणार असल्याचे यावेळी त्यांनी सांगितले. क्रांतिकारी शेतकरी संघटनेच्या माध्यमातून शेतकरी पुत्रांनी एकत्र येत राज्यात नवी क्रांती आपल्याला निर्माण करायचे आहे त्यासाठी मी स्वतः राज्यभर फिरून प्रत्येक जिल्ह्यात शिबिरे घेणार आहे असे देखील यावेळी तुपकरांनी सांगितले. क्रांतिकारी शेतकरी संघटनेच्या प्रत्येक पदाधिकाऱ्यांनी अगदी प्रामाणिकपणे चळवळीचे काम करावे, सोशल मीडियाचा योग्य




वापर करून चळवळीला आणि शेतकरी विचारांना मजबूत करा, येणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुका आपल्याला जोमाने लढायच्या आहेत त्यासाठी कार्यकर्त्यांनी उद्यापासूनच तयारीला लागावे, अशा सूचना करत सर्वे करून उमेदवार ठरविणार असल्याचे यावेळी त्यांनी सांगितले. यापुढे आपल्या चळवळीचे मुख्य केंद्र पुणे राहणार आहे , त्यासाठीच संघटनेची पहिली बैठक पुण्यात घेतली असल्याचे तुपकर यांनी सांगितले. क्रांतिसिंह नाना पाटील यांनी जशी इंग्रजांच्या काळात पत्री सरकारची स्थापना केली होती त्याच धर्तीवर मुजोरांना धडा शिकवण्यासाठी क्रांतिकारी शेतकरी संघटनेच्या माध्यमातून ङ्कङ्ककिसान आर्मीङ्कङ्क तयार करणार असल्याची घोषणा यावेळी रविकांत तुपकर यांनी केली. त्यानंतर क्रांतिकारी शेतकरी संघटनेच्या नवीन पदाधिकाऱ्यांच्या नियुक्त्या यावेळी रविकांत तुपकर यांनी जाहीर केल्या. क्रांतिकारी शेतकरी संघटनेचा पहिला प्रदेशाध्यक्ष म्हणून कोणाची वर्णी लागते याकडे सर्वांचे लक्ष लागून होते. महाराष्ट्र प्रदेशाध्यक्षपदी राजकुमार कसबे (लातूर) यांच्या नावाचे रविकांत तुपकर यांनी घोषणा करताच सर्वांनी टाळ्या वाजवून या घोषणेचे स्वागत केले. तर युवा आघाडीचे प्रदेशाध्यक्षपदी लक्ष्मण मोरे (नांदेड), युवती आघाडीचे अध्यक्षपदी ऍड अश्विनी मेहत्रे(मुंबई ), व्यापारी आघाडीचे राज्य सल्लागार पदी सागर मंत्री (पुणे )तसेच विदर्भ प्रमुखपदी वर्ध्याचे किरण ठाकरे, मराठवाडा विभाग प्रमुखपदी हिंगोलीचे गजानन कावरखे, उत्तर महाराष्ट्र प्रमुखपदी ईश्वर पाटील, धुळे तर पश्चिम महाराष्ट्र प्रमुखपदी पुणे येथील ऍड आदित्य आरेकर(पुणे ) तसेच पूर्व विदर्भ प्रमुख पदी सागर दुधाने(नागपूर )यांची नियुक्ती यावेळी रविकांत तुपकर यांनी जाहीर करून या सर्व नवीन पदाधिकाऱ्यांचा सत्कार केला. तसेच यावेळी काही जिल्हाध्यक्षांची देखील नियुक्ती करण्यात आली. यामध्ये अकोला जिल्हाध्यक्षपदी चंद्रशेखर गवळी, बुलढाणा - डॉ ज्ञानेश्वर टाले, वाशिम - बालाजी मोरे, नांदेड- बाळासाहेब जाधव, हिंगोली -नामदेव पतंगे, परभणी - भगवानराव शिंदे, लातूर - अरुण कुलकर्णी, लातूरच्या युवा आघाडी जिल्हाध्यक्षपदी प्रज्योत हुडे, सोलापूर युवा आघाडी जिल्हाध्यक्षपदी अमर इंगळे, नांदेड युवा आघाडी जिल्हाध्यक्षपदी अंगद पाटील आदींची देखील यावेळी नियुक्ती करण्यात आली.












# भाईजी म्हणाले...दायित्व कधीच कुणाला कमी पडू देत नाही!

**जनसंचलन/बुलढाणा**

दान हे सतपात्री करावे, एका हाताने दान करताना दुसऱ्या हाताला माहित पडू नये, दायित्व कधीच कुणाला कमी पडू देत नाही, असे प्रेरक विचार बुलढाणा अर्बन चे सर्वेसर्वा भाईजी उर्फ राधेशामजी चांडक यांनी व्यक्त केले. ते येथील दिव्यांग कल्याण व पुनर्वसन संस्थेच्या आयोजित दत्तक पालक मेळाव्यात बोलत होते. बुलढाणा येथील धाड नाका जवळ असलेल्या दिव्यांग कल्याण व पुनर्वसन संस्था द्वारा संचालित अस्थिव्यंग, मूकबधिर व अंध विद्यालयाच्या विद्यार्थ्यांचा दत्तक बालक पालक मेळावा व सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी भाईजी मार्गदर्शन करताना म्हणाले की,ईश्वराने अशी रचना केली की,कितीही वाटले तरी ज्ञान हे संपत नाही. ते वाढत जाते.तसेच धनही वाटले तर ते वाढते.केवळ सातपात्री दान करा..ते गुपित ठेवा असे भाईजी म्हणाले. या कार्यक्रमाला अध्यक्ष आमदार पुत्र कुणाल गायकवाड उपस्थित होते. तर जिल्हाधिकारी यांच्या पत्नी सेवा निवृत्त शिक्षिका शीलाताई किरण पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती. व्यासपीठावर शाईनाताई पठाण,राजेश देशलहरा, डॉक्टर उबरहांडे, डॉक्टर खासबागे यांच्यासह इतरही मान्यवर उपस्थित होते. याप्रसंगी मान्यवरांनी मनोगत व्यक्त केले. संस्था अध्यक्ष डॉ. एस. एम.छाजेड व सर्व सदस्य यांच्यासह कर्मचाऱ्यांनी अथक परिश्रम घेतले.

# कर्जमाफीसाठी मुंबईत आंदोलनाचा बॉम्ब !




**जनसंचलन/बुलढाणा**

मुलुख मैदानी तोफ पुण्यात आज धडाडली.. ही तोफ रविकांत तुपकर यांची होती.त्यांनी राज्य सरकारला इशारा देत १८ मार्चपर्यंत शेतकरी कर्जमाफीची घोषणा करा अन्यथा १९ मार्च रोजी मुंबई येथे आंदोलनाचा बॉम्ब टाकू असा खणखणीत इशारा दिलाय. शेतकऱ्यांच्या मागणीची दखल न घेतल्यास सरकार कितीही बलाढ्य बहुमताचे असले तरी त्यांना गुडघे टेकायला लावू असा इशाराही तुपकर यांनी दिला आहे. यावेळी राज्यभरातील शेतकरी चळवळीतील कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. पाशवी बहुमत मिळाल्याने मदमस्त बनलेले सत्ताधारी दारून पराभवाच्या धक्क्याने खंगून गेलेले विरोधक राज्याची अवस्था आहे. शेतकरी संघटनांची चळवळ शिथिल झालेली आहे. या साऱ्या परिस्थितीत महाराष्ट्रातील शेतकऱ्यांचा आश्वासक चेहरा असलेल्या रविकांत तुपकर यांनी क्रांतिकारी शेतकरी संघटनेची स्थापना केली आहे. शेतकरी चळवळीतील आक्रमक तेवढाच विश्वासू चेहरा अशी तुपकर यांची ओळख असल्याने त्यांच्या एका हाकेवर क्रांतिकारी संघटनेच्या पहिल्या राज्य कार्यकारिणी बैठकीला सोमवारी (दि.०३) पुणे येथे शेतकऱ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. राज्यभरातून शेतकरी चळवळीतील ज्येष्ठ तसेच तरुण शेकडो शिलेदार बैठकीसाठी पुणे येथे आले होते. यावेळी संस्थापक अध्यक्ष रविकांत तुपकर यांनी संघटनेची रूपरेषा, भूमिका आणि आगामी काळातील उद्देशाबाबत माहिती दिली. शेतकऱ्यांचा आवाज म्हणून क्रांतिकारी शेतकरी संघटना काम करणार असल्याचे त्यांनी सांगितले. दरम्यान तुपकर यांनी सत्ताधाऱ्यांच्या एकाधिकारशाही कारभारावर तुफान हल्ला चढवला. उत्पादन खर्च एवढाही भाव नसल्याने सोयाबीन आणि कापूस उत्पादक शेतकरी मरणाच्या दारात येऊन ठेपला आहे असे सांगत राज्यात ६० लाख मेट्रिक टन सोयाबीनचे उत्पादन झालेले असताना सरकारने केवळ १२ ते १५ लाख मॅट्रिक टन एवढ्याच सोयाबीनची खरेदी केली आहे. ती खरेदी करताना उत्पादन खर्च एवढाही भाव दिला नाही. कापूस पिकाची हीच अवस्था आहे. कांदा उत्पादकांच्या डोळ्यात पाणी असून दुधाला दर नाही. सत्तेवर आलेल्या राज्यकर्त्यांनी निवडणुकीपूर्वी कर्जमाफीचे आश्वासन दिले होते. सत्तेवर येताच त्यांना दिलेल्या आश्वासनाचा विसर पडला आहे. एवढा विसराळूपणा सत्ताधाऱ्यांना परवडणार नाही, असा इशारा दिला.

# पिस्टल..काडतूस अन् चाकू.. पण व्यापाऱ्याला लुटण्याचा कट उधळला!



**जनसंचलन/बुलढाणा**

जिल्ह्यात गुन्हेगारी वाढतेय कां? तर याचे उत्तर होय असेल! कारण दररोज एक तरी घटना पुढे येत आहे. ताजी घटना म्हणजे उद्योजकाला लुटण्याचा प्रयत्न करणाऱ्या ५ आरोपींना बुलढाणा एलसीबीच्या पथकाने अटक केली असून, तब्बल २ लाख १३ हजाराचा मुद्देमाल जप्त केला आहे.विशेष म्हणजे त्यांच्या कडून एक गावठी पिस्टल, दोन जिवंत काडतूस, दोन चाकू असे साहित्य हस्तगत करण्यात आले आहे. बालाजी इंडस्ट्रीज बिरसिंगपूर शिवारचे मालक नारायण सिनकर रा. बुलढाणा (तेलाचे व्यापारी) हे दिवसभराचे काम आटोपून रात्रीचे सुमारास माल विक्रीची रक्कम घेवून बुलढाणा स्थित घरी येतात.या बाबतची माहिती घेवून काही गुन्हेगारांनी त्यांच्यावर पाळत ठेवली. या बाबतची टिप घेवून, त्यांना रस्त्यात अडवून, रक्कम लुटण्याचा कट रचला होता. दरम्यान बुलढाणा स्था.गु.शा. पथकाला मिळालेल्या गुप्त माहितीवरून त्यांनी कार्यवाही केली आहे. बुलढाणा शहर ते अजिंठा रोडवर कृषी विज्ञान केंद्र- बुलढाणा जवळ स्वप्निल विष्णु गवळी वय ३० वर्षे रा. ता. भोकरदन जि. जालना, आकाश रमेश गवळी वय २३ वर्षे रा. वालसावंगी ता. भोकरदन जि. जालना, पवन जगन सपकाळ वय २५ वर्षे रा. सुंदरवाडी ता. भोकरदन जि. जालना, दत्ता सुनिल राऊत वय २५ वर्षे, रा. मुकुंदवाडी ता. जि. छत्रपती संभाजीनगर, लखन शालीग्राम सुर्यवंशी वय २४ वर्षे रा. जनुना ता. जि. बुलढाणा हे आरोपी त्यांचे साथीदारांसह व्यापारी नारायण सिनकर रा. यांना अडवून, त्यांचे कडील नगदी रक्कम लुटण्याच्या उद्देशाने तयार होते.मात्र त्यांचा कट उधळून त्यांना स्थानिक गुन्हे शाखा पोलिसांनी अटक केली आहे.रोबोट बुलढाणा शहर पोलीस ठाण्यात आरोपी विरुद्ध गुन्हे दाखल असून, सदर कामगिरी एसपी विश्व पानसरे यांच्या मार्गदर्शनाखाली एलसीबी प्रमुख अशोक लांडे यांच्या नेतृत्वातील पथकाने केली आहे.

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
आपल्या परिसरातील घडणाऱ्या घटना व बातम्या ९८२२७२०७८४ किंवा ९१२९५८२९५८ या व्हाट्सअप्प नंबर वर पाठवून आम्हाला सहकार्य करावे

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
===== बातम्या तसेच जाहिरातीसाठी संपर्क =====
संपादक - जितेंद्र कायस्थ 9822720784 ऑफिस :- 9129582958